नि.फौ.ख.क्र.७७१/२०१८
शासन–वि– सज्जू पठाण
नि.क्र. १९

मी शपथेवर खरे सांगते की,

माझे नांव – मोना अखिलेश भोंगाडे,
वय अंदाजे ३२ वर्ष, कामधंदा– खाजगी नोकरी,
राहणार– स्टेशन फैल, वर्धा, तह. व जि. वर्धा.

...........................................................................................................

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ ची सरतपासणी– सरकारी वकील सौ.ज्योती लकडे यांच्या मार्फत.**

१. मी आरोपीला ओळखते. ते माझे घरासमोर राहतात. माझे पती सन २०१६ मध्ये मरण पावले. त्यानंतर मी आईकडे राहायला आली. तिथे माझा भाउ ललीत रहांगडाले, वहिनी पायल रहांगडाले व आई संध्या रहांगडाले तसेच भावाचे दोन मुले राहतात. घटना दिनांक १९.०५.२०१८ रोजी सकाळी ८.०० वाजताचे दरम्यान आमच्या घरासमोरील सार्वजनिक रस्त्यावर घडली. त्याठिकाणी आरोपी आली व तिने बक–यांवरुन वाद घालून मला व माझ्या वहिनीला शिवीगाळ केली की, 'तू वेश्या आहे, तू धंदा करते' असे म्हणून आम्हाला जिवे मारण्याची धमकी दिली. आम्हाला भिती वाटल्यामुळे आम्ही पोलीस स्टेशनला गेलो व फिर्याद दिली. मला आता फिर्याद व छापील प्रथम खबर दाखविली. त्यावर माझी सही असून मला त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि.क्र.२० व २१** देण्यात आले. आरोपीने मला सार्वजनिक ठिकाणी शिवीगाळ केल्यामुळे मला खूप खराब वाटले व लाज वाटली.

**आरोपीतर्फे उलट तपास – कु.के.पी.गडपाल लोकअभिरक्षक अधिवक्ता**

२. हे म्हणणे खरे आहे की मी औषधीच्या दुकानात काम करते. हे म्हणणे खरे आहे की सकाळची वेळ माझी घाईचे असते व त्यामुळे घरातील कामात व्यस्त असते. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे मला बाहेर काय सुरु असते हे माहीत नसते. हे म्हणणे खरे आहे की आरोपीच्या घरी बक–या आहेत. हे म्हणणे खरे आहे की बक–यांवरुन आरोपी व माझे भावामध्ये जुना वाद होता. हे म्हणणे खरे नाही की त्यावरुन मी आणि माझ्या घरच्यांनी

आरोपीविरुध्द फिर्याद देण्याचे ठरविले होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने मला कोणतीही शिवीगाळ केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी सांगितल्याप्रमाणे कुठलीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

आरोपीतर्फे उलट तपास पुर्ण

फेरतपास नाही.

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीक्रुती | माझे समक्ष |
| GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE Date: 2025.11.24 17:20:07 +0530 | GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE Date: 2025.11.24 17:20:12 +0530 |
| (जी.व्ही.जांगडे–देशपांडे) | (जी.व्ही.जांगडे–देशपांडे) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, | मुख्य न्यायदंडाधिकारी, |
| वर्धा, दिनांक २०–११–२०२५ | वर्धा, दिनांक २०–११–२०२५ |